# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## पशुवैद्यकीय विभाग

### जाहिर सुचना क्र.०३/२०२५-२६ अ.क्र.०१

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका पशुवैद्यकीय विभाग कार्यालयाकडून खाली नमुद केले कामासाठी एजन्सी कडून जाहिर निविदा www.smkc.gov.in या महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजीत रक्कम रु. | फॉर्म फी.र.रु. | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १. | आरोग्य विभागा अंतर्गत डॉग युनिट करीता भटकी श्वान पकडणेसाठी जाळी खरेदी करणेस व याकामी होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत. | ९९,८४०/- | रु.५००/- | ३० दिवस |

१. निविदे सोबत १% बयाणा रक्कम युनियन बँक ऑफ इंडीया, सांगली येथे मनपा खाते क्र.४२४२०२०१०५०२७०८ मध्ये भरणेचा असून बँकेचे चलन लिफाफा क्र.१ मध्ये जोडणेचा आहे

२. निविदा फॉर्म मिळण्याचे व सादर करण्याचे ठिकाण पशुवैद्यकीय विभाग,तरुण भारत स्टेडीयम सांगली.

३. संपुर्ण निविदा प्रक्रिया म्हणजे अर्ज विक्री, सादरीकरण व स्विकृती आरोग्य विभाग मुख्यालय सांगली द्वारे कार्यरत राहील.

४. निविदा संचाची विक्री पशुवैद्यकीय विभाग तरुण भारत स्टेडीयम सांगली येथे दि.१२/१२/२०२५ ते दि.१८/१२/२०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत उपलब्ध केली जातील व दि.१८/१२/२०२५ रोजी सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

५. निविदा दिनांक१९/१२/२०२५ सायंकाळी ०४.०० वाजता निविदा कमीटी समोर उघडण्यात येतील.

६. निविदा प्रक्रियेबाबत अधिक माहीतीसाठी महानगरपालिका पशुवैद्यकीय विभाग तरुण भारत स्टेडियम समोर सांगली येथे संपर्क साधावा.

७. या निविदा बाबतच्या शर्ती अटी पशुवैद्यकीय विभाग तरुण भारत स्टेडियम समोर सांगली येथे उपलब्ध आहेत.

८. कोणतेही एक टेंडर स्विकारणे अथवा कोणतेही कारण न दाखवता सर्व टेंडर नाकारणेचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवले आहेत.

पशुवैद्यकीय अधिकारी
सांगलीमिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## पशुवैद्यकीय विभाग

## जाहिर सुचना क्र. ०३/२०२५-२६

विषय- आरोग्य विभागा अंतर्गत डॉग युनिट करीता भटकी श्वान पकडणेसाठी जाळी खरेदी करणेस व याकामी होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत. निविदा रक्कम रुपये-९९,८४०/-

शर्ती व अटी

निविदा दोन लिफाफा पध्दतीने द्याव्यात

अ. लिफाफा क्र. १ यामध्ये खालील तांत्रिक कागदपत्रे आवश्यक आहेत

i) बयाणा चलन आणि निविदा फॉम फी चलन

१. वस्तु व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र (GST Registration Certificate) आणि GST-R३ लगतचा जोडावा.

२. पॅनकार्डची प्रत ( कंपनी/भागीदारी संस्था निविदा भरत असेल तर संबंधित कंपनी/भागीदारी संस्था यांच्या नावाचे पॅनकार्ड असणे बंधनकारक आहे. प्रोप्रायटरी फर्म्सचे पॅनकार्ड प्रोप्रायटरच्या नावाचे असावे)

३.निविदाधारकांचे (Bidder) कंपनी /भागादारी संस्था/ प्रोप्रायटरी फर्म्सचे संबंधित संस्थांचे नोंदणी प्रमाणपत्र (कंपनी असेल तर कंपनी अधिनियमांतर्गत नोंदणी प्रमाणपत्र, भागीदारी संस्था असेल तर भागीदारी संस्था नोंदणी प्रमाणपत्र व आस्थापना अधिनियमांतर्गत (गुमास्ता) नोंदणी प्रमाणपत्र.

४.सरासरी वार्षिक उलाढाल - निविदाकाराची मागील ३ वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल कामाच्या किमतीच्या किमान ७५% असावी. याबाबत उलाढाल प्रमाणपत्र (Turnover Certificate) Chartered Accountant (सनदी लेखापाल) यांनी प्रमाणित केलेले असावे.

५. अनुभव- निविदाकाराने मागील ३ वर्षात शासकीय / निम शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये खालीलप्रमाणे पुरवठा केलेले किवा उत्पादन केलेले समतुल्य काम (समतुल्य काम म्हणजे निविदे मध्ये नमुद कामाचे स्वरुप व व्याप्ती असेल त्याच क्षेत्रातील कामाचा अनुभव) केलेले असणे आवश्यक आहे.(अनुभवासाठी निविदाकाराने प्रत्येक्ष काम केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.कार्यादेश चालणार नाही.)

६. व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (PT) / कर्मचारी भविष्य निर्वाह निधी प्रमाणपत्र (EPF) / कर्मचारी राज्य विमा निगम चे प्रमाणपत्र (ESIC)

७. निविदाकाराला गेल्या ५ वर्षामध्ये शासकीय / निम शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था/ महामंडळाने काळ्या यादीत टाकलेले नाही याबाबतचे निविदाकराच्या लेटर हेड वरील हमीपत्र

८. निविदाकाराने निविदे सोबत सादर केलेल्या दस्ताऐवजांची सत्यता दर्शविणारे रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र

९. टेंडर फॉर्मवर दर देताना कामगिरीच्या तपशिलानुसार दर सर्वकरासहित देणेचा आहे

१०. पशुवैद्यकीय अधिकारी यांनी मागणी केलेनुसार आवश्यक साहित्य पुरवठा करणे मंजूर मक्तेदारांवर बंधनकारक राहील

११. कामगिरी वेळेत करणे बंधनकारक आहे.

१२. निविदे सोबत १% बयाणा रक्कम युनियन बँक ऑफ इंडीया, सांगली येथे मनपा खाते क्र.४२४२०२०१०५०२७०८ मध्ये भरणेचा असून बँकेचे चलन लिफाफा क्र.१ मध्ये जोडणेचा आहे किंवा बयाणा रक्कमेचा डी.डी. मा. आयुक्त सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचे नांवे काढून त्याची प्रत टेक्निकल लिफाफा मध्ये जोडणेचे आहे व मुळ चलन निविदा उघडतेवेळी समक्षात सादर करणेचे आहे.

१३. टेंडर भरताना खाडाखोड केली असल्यास तेथे टेंडर भरणाऱ्याने स्वाक्षरी केली पाहिजे.

१४. टेंडर मंजुरी नंतर मंजुर दराने कामगिरीची लेखी ऑर्डर ठेकेदारास देण्यात येईल.

१५. ज्यांचे नावे निविदा मंजूर होईल त्यांनी एकूण रकमेच्या ५% सुरक्षा अनामत रोखीने भरून स्वखर्चाने इकडील नमुन्यात लेखी करारपत्रकरून देणेचे आहे.

१६. वरील प्रमाणे पुर्तता केली नाही तर बयाणा रक्कम जप्त करणेत येईल व महापालिकेत पुन्हा कराव्या लागणाऱ्या खटाटोपीमुळे जो प्रत्यक्ष ज्यादा खर्च होईल त्या नुकसानीच्या खर्चाची जवाबदारी ज्यांचे नावे टेंडर मंजुर होईल त्यांचे जाती इस्टेटीवर राहिल.

१७. ज्या टेंडरदाराचे टेंडर मंजुर झाले आहे त्यास कोणत्याही कारणास्तव टेंडर मागे घेता येणार नाही. अथवा परस्पर इतर व्यक्ती, संस्था, भागीदार यांना हस्तांतरीत करता येणार नाही.

१८. कोणतीही एक अथवा सर्व निविदा मंजूर अथवा नामंजुर तसेच निविदा रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्तसो यांचेकडे राहिल.

१९. तसेच शर्ती व अटीमध्ये बदल करण्याचा व वाढ करण्याचा व तसेच निविदा दाखल करणेस मुदतवाढ देणेचा अधिकार महापालिकेने राखून ठेवला आहे. टेंडर शर्ती अटीमधील सर्व बाबींची पुर्तता करू शकणाऱ्या आणि निविदामध्ये नमुद कामगिरी करू शकणाऱ्या निविदा धारकांनीच निविदा भरण्याच्या आहेत.